महाराष्ट्र शासन

# सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर


शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्रं.:- ०७१२-६४६५१४५/१४६,

Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur@dtemaharashtra.gov.in


क्रमांक :- तंशिस/विकाना/डीबीटी पोर्टल /२०२१-२२/ 1117 दिनांकः- 25 MAR 2022

प्रति,
प्राचार्य /संचालक,
सोबत जोडलेल्या यादीतील संस्था,
नागपूर विभाग, नागपूर.

विषय :- डीबीटी पोर्टलवरील तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणा-या योजनांतर्गत शैक्षणिक वर्ष २०१८-१९, २०१९-२० , २०२०-२१ मधील संस्था व विद्यार्थी स्तरावरील प्रलंबित असलेल्या अर्जावर कार्यवाही करण्याबाबत.

संदर्भ :- मा. संचालक, तंशिसं, म.रा.मुंबई कार्यासन क्र.१८ यांचे दि. २४/०३/२०२२ रोजीचा दुरध्वनी संदेश.

शैक्षणिक वर्ष २०१८-१९, २०१९-२० , २०२०-२१ मधील महाडिबीटी पोर्टलवरील, तंत्रशिक्षण संचालनालयांमार्फत राबविण्यात येत असलेल्या शिष्यवृत्ती योजनांतर्गत संस्थास्तरावरील तसेच विद्यार्थ्याच्या लॉगीन मध्ये **I & II Installment, Send back to applicant , Not Alloted** अंतर्गत विद्यार्थ्याचे प्रलंबित असलेले अर्ज तात्काळ निकाली काढण्याबाबत संदर्भिय संदेशाव्दारे या कार्यालयास कळविण्यात आलेले आहे.

तसेच या कार्यालयामार्फत संस्था व विद्यार्थी स्तरावरील प्रलंबित असलेले अर्ज निकाली काढण्याबाबत आपणास वारंवार सुचित करून सुद्या महाडिबीटी डॅशबोर्डनुसार यादीतील संस्थांनी प्रलंबित अर्जावर अद्याप पर्यत कार्यवाही न केल्याचे निर्दशनास आलेले आहे. ही अत्यंत खेदाची बाब आहे.

तरी उपरोक्त विषयांन्वये आपणास सुचित करण्यात येते की, ज्या संस्थेतील प्रवेशित विद्यार्थ्याचे शिष्यवृत्तीचे अर्ज अद्याप पर्यत संस्था व विद्यार्थी लॉगीन मध्ये प्रलंबित आहे. **त्या संस्थेतील शिष्यवृत्ती हाताळणा-या कर्मचा-यांनी शिष्यवृत्ती अर्जाअंतर्गत प्रलंबित असलेल्या विद्यार्थ्याच्या यादी व कारणासह** दि. 28/03/2022 **रोजी प्रत्यक्षात या कार्यालयास उपस्थित राहावे.**

(डॉ. मनोज भा. डायगव्हाने)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

प्रतः- मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय ,म.रा.मुंबई (कार्यासन क्र. १८) यांना माहितीकरिता मानार्थ सादर.